**कौ.हि.प्र.क्रं.५४/२०२०**
**<u>नि.क्र. ३६</u>**

**<u>गैरअर्जदारा तर्फे साक्षीदार क्र.२</u>**
**<u>शपथेवर कथन करतो की,</u>**

**नाव — रमेशराव तूकारामजी दातीर, वय — ७१ वर्षे**

**<u>गैरअर्जदारा तर्फे जादा सरतपास विधीज्ञ श्री. व्ही. बी. भोसे</u>**

**०६.** मी नि.क्र.३६ प्रमाणे प्रतिज्ञालेख दाखल केला. सदरहु प्रतिज्ञालेख मी वाचुन व समजावुन घेतला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

०७. अभिलेखात मी यादी नि.क्र.३४/१ प्रमाणे मी दस्तऐवज दाखल केला आहे. सदरहू दस्तऐवज डॉक्टरचे प्रमाणपत्र आहे.

**<u>सरतपास — पुर्ण</u>**

**<u>अर्जदारा तर्फे उलटतपास विधीज्ञ श्रीमती पी. आर. गोवणे</u>**

०८. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ डॉक्टरने दिलेली फाईल घेवून तो उपचाराकरीता डॉक्टरकडे जातो. माझ्या मुलाचे रक्तगट 'ओ' आहे. माझ्या पत्नीचा रक्तगट मला माहीत नाही. किडणी कोणाला दयायची असल्यास दोघांचेही रक्तगट एकच असले पाहीजे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिज्ञालेख वकीलांनी तयार केला होता त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिज्ञापत्रातील मजकूर वकीलांनी लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ हा माझा मुलगा असल्याने मी त्याच्या बाजून साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही माझ्या मुलाची फाईल घेवून गेल्यामुळे किडणीचे प्रत्यरोपण करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञालेखातील तब्येतेविषयीचा मजकूर खोटा लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास — पुर्ण</u>**

**<u>फेरतपास — नाही.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

THAKARE ISHWAR JAMSING
Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING
Location: CJJD & JMFC, WARUD
Date: 2026.01.19 17:23:39 +0530

दिनांक : १९/०१/२०२६.
ठिकाण : वरुड.

**( आय. जे. ठाकरे )**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधीकारी कोर्ट क्र.१
वरुड